# राजकीय पक्षांचे अर्थकारण

**२० एप्रिल २०१२**

प्रज्ञा शिदोरे आणि तन्मय कानिटकर

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.

contactus.greenearth@gmail.com

(शासनव्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# राजकीय पक्षांचे अर्थकारण

- राजकीय पक्षांचे अर्थव्यवहार कसे व्हावेत, किंवा त्यात किती पारदर्शकता असावी याबाबत भारतात पुरेसे कायदे नाहीत. (Representation of People Act, 1951; Income Tax Act,1961; Companies Act)
- २० हजारापेक्षा जास्त देणगी कोणी पक्षाला दिली तर त्या व्यक्तीचे किंवा कंपनीचे नाव जाहीर करावे लागते.
- वर्षाच्या शेवटी पक्षाच्या अर्थव्यवहारांचे ऑडीट निवडणूक आयोगाकडे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच ही सादर केलेली कागदपत्रे निवडणूक आयोगाने लोकांसाठी खुली करणे आवश्यक आहे. मात्र याची अंमलबजावणी कितपत काटेकोरपणे केली जाते याबाबत शंका आहे.
- २० हजारांपेक्षा कमी रकमेच्या देणग्यांची टक्केवारी प्रचंड आहे. मोठ्या प्रमाणावर काळा पैसा या मार्गाने पक्षाकडे येत असण्याची दाट शक्यता आहे.
- २० हजारापेक्षा जास्त देणगी देणाऱ्यांची २००८-०९ मध्ये असलेली टक्केवारी- भाजप-१४, कॉंग्रेस-६, बसपा-०, माकप- १, भाकप-२२, सपा-१, राष्ट्रवादी-१४, राजद-२५.[1]
- माझ्या मते, छोट्या प्रमाणावर देणगी देणाऱ्यांची संख्या जास्त असणे अगदी साहजिक आहे. शिवाय त्यांची नावे खुली करण्याचे बंधन न ठेवणे हेही समजण्यासारखे आहे. कारण गुप्त मतदानाप्रमाणेच याबाबतही गुप्तता राखणे आवश्यक आहे.
- एखाद्या पक्षाचे आर्थिक व्यवहारांवर देखरेख ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाच्याच हाताखाली एखादी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करता येऊ शकते.
- राजकीय पक्षांचे कामकाज कसे चालावे, त्यांचे नियम कसे असावेत, त्यांचे व्यवहार सांभाळणारी यंत्रणा कशी असावी याबाबत कायद्यात पुरेशी स्पष्टता नाही. काही संस्थांनी[2]

[1] http://adrindia.org/research-and-reports/political-party-watch/2010/income-and-expense-details-income-tax-filed-political-parties

राजकीय पक्षांचे सर्व व्यवहार कसे असावेत हे ठरवणारा कायदा असावा असे सुचवले असले तरी ते कितपत योग्य ठरेल याबाबत शंका वाटते.

- मात्र, राजकीय पक्षांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पुरेशी पारदर्शकता आणणे आवश्यक आहे याबाबत दुमत असायचे कारण नाही. आणि त्यासाठी कायदा करणे आवश्यक आहे. विशेषतः पक्षाने केलेला खर्च, रोख-धनादेश याद्वारे देणगी स्वीकारणे याबाबत नियमन करणे आवश्यक आहे.
- सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी झाली तरी मोठ्या प्रमाणात फरक पडू शकेल. निदान पक्षांच्या अर्थव्यवहारांची काही प्रमाणात तरी माहिती पुढे येईल.

**एखाद्या पक्षाला लागणारे वैध खर्च.**

१. कार्यालये, कार्यालयीन खर्च.

- मुख्यालय- इतर सर्व कार्यालयांमध्ये-विभागांमध्ये समन्वय राखणे.
- शाखा- प्रभागवार, मतदारसंघ निहाय शाखा कार्यालये.
- वेगवेगळ्या विभागांसाठी असलेली कार्यालये- पर्यावरण, सांस्कृतिक, महिला, विद्यार्थी इ.

२. अभ्यास गट

- विषयानुसार अभ्यास करणारे गट
- अस्थायी/ तात्पुरत्या स्वरूपाचे अभ्यास गट- काही विषयांवर तातडीने निर्णय घेणे भूमिका घेणे आवश्यक असते. यासाठी अस्थायी स्वरूपाचे अभ्यास गट.

३. मोर्चे- आंदोलने- सभा

---

[2] 3S Bharat, ADR etc.

- विशिष्ट मुद्द्याबाबत आंदोलन मोर्चा किंवा सभा आयोजित करायची असल्यास होणारा खर्च. सत्तेत नसताना यावर होणारा खर्च अपरिहार्य.

४. प्रसार माध्यमे

- पक्षाकडे स्वतःची अशी काही प्रसार माध्यमे हाताशी असणे नक्कीच फायद्याचे.
- मासिक वर्तमानपत्र इ.
- सध्या भारतात राजकीय स्वरूपाच्या रेडिओला परवानगी नाही. पण भविष्यात हा लोकांपर्यंत पोचायचा एक मोठाच मार्ग.

५. विधी विभाग

- पक्षावर, पक्षाच्या नेत्यांवर दाखल होणाऱ्या केसेस लढवण्यासाठी त्याबाबत सल्ले देण्यासाठी.
- कोणतेही काम करताना (आंदोलन,कार्यक्रम, उपक्रम) विधी विभागाने कायद्याच्या चौकटीत गोष्टी आहेत ना, नसतील तर त्या कोणत्या, तरीही त्या केल्यावर काय परिणाम होईल, त्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी काय काय तयारी करून ठेवता येईल असा अहवाल.
- काही गोष्टींची लढाई कोर्टात जाऊन करावी लागते. जनहित याचिका दाखल करणे वगैरे गोष्टींसाठी स्थायी स्वरुपाचा विधी विभाग पक्षाकडे असणे गरजेचे.

६. सांस्कृतिक, क्रीडा तसेच इतर नैमित्तिक कार्यक्रम आयोजित करणे

- पक्षाने अधून मधून सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. कला, क्रीडा हे लोकांना पक्षाच्या जवळ आणण्याचे मार्ग.

- सध्या अनेक लोकप्रतिनिधी, इच्छुक नेते, पक्षाचे पदाधिकारी वेगवेगळे सांस्कृतिक-क्रीडा कार्यक्रम आयोजित करत असतात. मात्र यात त्यांचे वैयक्तिक महत्व वाढते. म्हणूनच पक्षाचे महत्व ठसण्यासाठी पक्षातर्फे अधून मधून असे कार्यक्रम आयोजित व्हावेत.

- १ मे, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १९ फेब्रुवारी, २ ऑक्टोबर, १४ एप्रिल, २३ मार्च अशा ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाच्या दिवसांना विविध नैमित्तिक कार्यक्रम आयोजित करावेत. या कार्यक्रमांचा उपयोग, आपला पक्ष इतर पक्षांपासून कसा वेगळा आहे हे दाखवण्यासाठी. उदा. १४ एप्रिल- आंबेडकर जयंतीला भारतीय संविधान या विषयावर परिसंवादाचे व्याख्यानाचे आयोजन इ.